# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

मा. महापौर व सभासद बंधू भगिनींनो,

सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' आपल्यापुढे सादर करीत आहे.

मा.स्थायी समितीच्या अध्यक्षपदी आमची दिनांक ७/३/२०१५ रोजी बिनविरोध निवड झाली आहे. या नंतर मा. आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर मा.स्थायी समिती सदस्या समवेत विचारविनिमय करुन मा.स्थायी समितीने फेरबदल करुन, अंदाजपत्रक मा.महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी मर्यादित स्वरुपाच्या असून, शहर व हद्दवाढ वासियांना योग्य प्रकारे मूलभूत सेवासुविधा देण्याचे कर्तव्य महानगरपालिकेस पार पाडावे लागते. एकूण खर्चामध्ये दिवसेंदिवस सातत्याने वाढ होत आहे व येणारे उत्पन्न मर्यादित आहे. यामध्ये जरुर त्याबाबीत वाढ करुन आम्ही हे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सन २०१५-२०१६ चे महसुली व भांडवली अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी र.रु.१०३९,१३,३६,४०१/- च्या रकमेचे सादर केलेले होते. या अंदाजपत्रकातील जमा व खर्च बाजू बाबत मा.स्थायी समितीचे सदस्या समवेत व संबंधित खाते प्रमुख यांचेबरोबर प्राथमिक स्वरुपात चर्चा करुन मा.स्थायी समितीने जमा व खर्चामध्ये फेरफार करुन वाढ केलेली अहे. सदरच्या रकमेतून खर्चाकडे आवश्यक त्या बाबीकरिता ज्यादा तरतूद करुन र.रु. ८२,०२,००,०००/- भांडवली कामासाठी वर्ग केलेली आहे. प्रस्तुत अंदाजपत्रक सादर करताना शहर व हद्दवाढ भागात अंतर्गत मलनि:स्सारण योजना राबविणेकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत जवळ जवळ ९०% कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. जेणेकरुन सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरीकांना चांगल्या सेवा सुविधा मिळाल्या पाहिजेत यादृष्टीने आमचे प्रयत्न आहे. यासाठी चालू अंदाजपत्रकामध्ये हद्दवाढ भागात जास्तीत जास्त विकासाची कामे

करण्यासाठी भरीव तरतूद करण्यांत आलेली आहे तसेच शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांना पुरेसा आणि चांगल्या दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी देखील युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत विविध भागात पाण्याचे पाईपलाईन टाकणेचे काम प्रगतीपथावर असून लवकरच शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांना पुरेसा प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे.

सदरचे अंदाजपत्रक तयार करताना मा.पदाधिकारी, मा.स्थायी समिती सदस्य, मा.आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी आम्हास सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल त्यांचे आम्ही व्यक्तिश: आभारी आहोत.

तसेच सोलापूर महानगरपालिकेतील गेली वीस वर्षांची परंपरा मोडून, माझी मा.सभापती स्थायी समिती या पदी बिनविरोध निवड केल्याबदल आमच्या पक्षातील वरिष्ठ नेते व म.न.पा. तील सत्ताधारी काँग्रेस-राष्ट्रवादी पक्ष, विरोधी भारतीय जनता पार्टी, शिवसेना पक्ष तसेच बसपा - माकपा हया सन्माननीय सदस्यांचा मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

मा. स्थायी समितीने तयार करुन शिफारस केलेल्या सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक त्यांच्या सूचना व शिफारसीसह मा. महानगरपालिकेने मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

**श्री. पद्माकर (नाना) केशव काळे**

**अध्यक्ष स्थायी समिती,**

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर.